# सरकार - न्यायपालिकेव्दारा संविधानात्मक आरक्षणाचे राजकारणः एक समिक्षा

**ॲड. (डॉ.) सुरेश माने**
**बी.कॉम. एल.एल.एम. पीएचडी (लॉ)**
**संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष**
**बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टी**

भारताच्या घटनात्मक लोकशाही राज्यव्यवस्थेत राज्यघटनेचा अर्थ-अन्वयार्थ न्याय-निवाड्याव्दारे स्पष्ट करण्याची जबाबदारी उच्च्य न्यायालये व अंतिमतः सर्वोच्च्य न्यायालयाची असून सर्वोच्च्य न्यायालय निर्णय हा राज्यघटना १४१ कलमान्वये कायदाच होय. १ ऑगस्ट २०२४ रोजी मा. सर्वोच्च्य न्यायालयाने पंजाब सरकार विरूध्द दविंदर सिंग निर्णयात अनुसूचित जाती-जमातीचे उपवर्गीकरणाव्दारे नवीन मांडणी केलेली आहे. हा निर्णय अतिमागास किंवा अतिउपेक्षित, जाती-जनजाती समुदाय करीता योग्य असल्याचे प्रतिपादन केले जात आहे. काहीच्या मते हा निर्णय म्हणजे जातीअंतर्गाचे परस्परविरोधी वास्तवरूप होय, काहीच्या मते या निर्णयानिमीताने नवीन संविधानात्मक समाजशास्त्राची मांडणी केली आहे, तर काहीच्या मतानूसार न्यायमुर्ती श्री भूषण गवई, व इतर तीन न्यायाधिशांच्या भूमिकाव्दारे अनुसूचित-जाती-जमातींना ''क्रेमिलियर'' लावण्याच्या उच्यभ्रू जात-वर्गाच्या मानसिक व राजकिय निर्णयावर शिक्कामोर्तब केले आहे.

सर्वोच्च्य न्यायालय निर्णयाने प्रश्न संपूष्टात यावेत ही अपेक्षा असताना या निर्णयाने मात्र अनेक नवीन प्रश्नांना जन्म दिलेला आहे. या निर्णयाव्दारे अनूसुचित जाती-जमातीचे उपवर्गीकरणासोबतच आर्थिक निकष टेस्टचा वापर कोर्टासमोर हा विषय नसतानादेखील अनु. जाती-जमातीना क्रेमिलियरची अट वापरात आणण्याची शिफारस न्यायमूर्ती श्री भूषण गवई व इतर तीन न्यायमुर्तींनी सरकारला केली आहे. अनु. जाती-जमातीमध्येच या निर्णयाबाबत प्रतिक्रिया प्रकट होत आहेत. त्यामध्ये अनु. जाती जमातीच्या अशा वर्गीकरणामुळे काही प्रमाणात का होईना परंतू एकत्रीत झालेला अनुसूचित जाती-जमातीचा वर्ग पुन्हा एकदा आरक्षण लढाईमुळे विस्कळीत, विघटीत व परस्पर विरोधी होणार असल्यामुळे भविष्यात हा वर्ग आरक्षण संघर्षामध्ये विभाजित होऊन आणखी शक्तीहिन होईल असे बहुतांशी आंबेडकरी दलित-आदिवासी समुदायाला वाटते. तर या निर्णयाने अतिमागास हिंदू दलितांचा शिक्षण-नोक-यात सहभाग वाढेल अशी भाबडी आशा हिंदू-दलित- आदिवासींना वाटते. मात्र देशातील इतर जाती-वर्गास दलित-आदिवासींना क्रेमिलियर कक्षेत आणल्याने न्यायमुर्ती गवई व इतर न्यायमुर्तीचा निर्णय क्रांतीकारक वाटतो आहे तर एकूण सात न्यायाधिशापैकी न्यायमुर्ती श्रीमती बेला त्रिवेदी यांचा बहुमतांशी असहमताचा स्वतंत्र निर्णय अनुसूचित जाती-जमातीतील अनेकांना राज्यघटनेशी-सुसंगत, आश्वासक व योग्य वाटतो.

वर्गीकरणाच्या या निकालात प्रमुख न्यायमुर्ती डॉ. चंद्रचूड व मनोज मिश्रा यांनी एकत्रित निकाल दिलेला असून इतर पाच न्यायाधिशांनी स्वतंत्र निकाल दिले आहेत. यातील न्यायमुर्ती श्रीमती बेला त्रिवेदी या वगळता इतर सर्व सहा न्यायमुर्तीनी अनु. जाती-जमातीचे वर्गीकरण हे राज्यघटनेच्या कलम १४,१५,१६, ३४१, ३४२ कलामांशी विसंगत नसल्याचा निर्णय दिला असून न्यायमुर्ती श्री भूषण गवई व इतर तीन न्यायमुर्तींनी अनु. जाती-जमातीना क्रेमिलियर धोरण लावण्याची शिफारस केली आहे, जी न्यायमुर्ती डॉ. चंद्रचूड, मनोज मिश्रा व श्रीमती त्रिवेदी यांनी अजिबात केलेली नाही.

खरेतर उदारीकरण-खाजगीकरण, कंत्राटीकरण या महाकाय अजगरांनी मिळंकृत केलेल्या आरक्षण धोरणाची वारंवार फेरमांडणी झाली आहे. त्याला जशी सरकारे जबाबदार आहेत तसे राजकारण, समाजकारण व न्यायपालिका देखील जबाबदार आहे. याची सुरवातच मुळी राज्यघटना लागू झाल्यानंतर लगेच १९५१ मध्येच सर्वोच्च्य न्यायालयाच्या चंपाकम दूराईराजन या खटल्याने झाली. तद्नंतर काका कालेलकर कमीशनची नेहरू सरकारने लावलेली विल्हेवाट, पंडित जवाहरलाल नेहरूचे देशातील मुख्यमंत्राना दिनांक २७ जुन १९६१ चे आरक्षण विरोधी पत्र, मंडल निकालपत्र (१९९२), नागराज निकालपत्र (२००६) आणि सर्वात अलीकडील जर्नेलसिंग निकालपत्रे (२०१८) व (२०२२) या सर्व निर्णयांनी दिवसेदिवस अनू. जाती-जमातीच्या आरक्षणाला आळा घातला असून व्याप्ती कमी केलेली आहेच परंतू गुंतागुंतीचा प्रश्न केला आहे. संसदेने ७७, ८१, ८२ व ८५ या घटनादुरूस्तीव्दारे संविधानात्मक आरक्षण पध्दतीला सर्वोच्च्य न्यायालयाच्या निर्णयानी छेद दिल्यानंतर, राखीव जागा धोरण, पदोन्नती धोरण, वरियता धोरण, रोस्टर पॉलीसी या सर्वांना पुर्नप्रस्तापित करीत आरक्षण धोरणाला बळकटी दिलेली आहे हे असुन सुध्दा र्दुदवाने सर्वोच्च्य न्यायालयाच्या अनेक निर्णयामधून उच्च जाती वर्गाचे समाजकारण व राजकारण याचे प्रगटीकरण होते ही अत्यंत खेदाची व संविधानिक भारताच्या दृष्टीने धोक्याची बाब आहे.

अनु. जाती-जमाती यांच्या विभाजणाचे प्रयत्न व सरकारी धोरणे या देशात १९७५ (पंजाब राज्य) पासून अनेक राज्यात राबविली गेली आहे आणि यामध्ये कॉंग्रेस, टीडीपी, डीएमके नितीशकुमारांची जनता दल व अलीकडील आप नावाचा पक्ष देखील यामध्ये सामील आहेत. सर्वोच्च्य न्यायालयाच्या निर्णयाअगोदर असे विभाजन करण्याकरिता केंद्रातील मोदी सरकारने कॅबीनेट सेक्रेटरी यांच्या अध्यक्षतेखाली एक कमेटी नेमलेली असुन महाराष्ट्रातील बीजेपी, एनसीपी, शिवसेना सरकारने सुध्दा एक उपसमिती नेमलेली आहे. तर १ ऑगस्ट २०२४ रोजी मुंबईत थोर साहित्यीक, लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांच्या जयंती कार्यक्रमात अनुसूचित जातीच्या वर्गीकरणासाठी लवकरच उच्च्य न्यायालय माजी न्यायमुर्ती अघ्यक्षतेखाली आयोग नेमण्याची घोषणा राज्य उपमुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. शिवाय लोकसभा निवडणूक २०२४ प्रचार दरम्यान तेलंगणा राज्यातील एका जाहीर सभेत स्वतः पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी वर्गीकरण करणार असल्याचे जाहीर केलेले होते. एकंदरच काय

तर मा. सर्वोच्च्य न्यायालयाच्या या निर्णयाने घटनाकारांच्या मतविरोधात उपवर्गीकरण्याच्या माध्यमातून जाती-जातीचे व वोट बैंकेचे राजकारण करणा-या राजकीय पक्षांना व शक्तींना कायदेशीर पाठबळ मिळालेले असल्यामुळे देशभर ही प्रक्रिया गतीमान होण्यास वेळ लागणार नाही.

नेमकी हीच बाब लक्षात घेऊन राज्यघटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाणीवपूर्वक घटणासमितीमध्ये हे स्पष्ट केले होते की घटनेच्या कलम ३४१ नुसार संसदेने बनविलेल्या अनु. जाती-जमातींच्या यादीमध्ये राज्यसरकारला कोणताही हस्तक्षेप करता येणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची हीच भुमिका आजपर्यंत संसद व न्यायपालिकेने उचलून धरलेली असतांना व त्याबाबत घटनापीठाच्या अनेक खंडपीठांनी निर्णय दिले असतांनाही, विशेषतः २००४ मध्ये चिन्नया प्रकरणातील सर्वोच्च्य न्यायालयाच्या संविधानपिठाचा वर्गीकरण विरोधी निर्णय असतानासुध्दा सर्वोच्च्य न्यायालयाला १ ऑगस्ट २०२४ रोजी पंजाब सरकार विरूध्द दविंदर सिंग या प्रकरणाव्दारे अनेक वर्षे प्रस्थापित झालेल्या कायदेशीर धोरणाला विस्तापित करण्याची गरज नव्हती तरीदेखील सर्वोच्च्य न्यायालयाने हे केलेले आहे हा चिंतेचा विषय होय.

अनु. जाती-जमातीचे वर्गीकरण करतांना राज्यसरकारानी शास्त्रीय पध्दत अवलंबून आकडेवारी आधारे अशा प्रकारची वर्गवारी करावी असाही निर्णय न्यायालयाने दिलेला आहे. शिवाय, असे वर्गीकरण करताना चूकीची पध्दत किंवा आकडेवारी आधारे वर्गीकरण केल्यास अश्या वर्गीकरण करण्यास न्यायालय रद्द करतील असेही स्पष्ट केलेले आहे. मात्र हा निर्णय देतांना सर्वोच्च्य न्यायालयाने वर्गीकरण समर्थनार्थ कोणतीही आकडेवारी किंवा अहवाल केंद्र सरकार किंवा राज्यसरकारे यांच्याकडून मागीतले नाहीत ही सुध्दा न्यायदान प्रक्रियेतील विसंगतीची बाब होय. विशेष म्हणजे सर्वोच्च्य न्यायालयाच्या तीन न्यायमुर्तीच्या खंडपिठाने पाच न्यायमुर्तीच्या खंडपिठाव्दारे दिलेल्या २००४ च्या चिन्नया  केसचा पुर्नविचार व्हावा आणि त्यासाठी मोठया खंडपिठाकडे हे प्रकरण सोपवावे अशी केलेली सिफारस देशाचे प्रमुख न्यायमुर्ती डॉ. चंद्रचुड यांनी स्वीकारून सात न्यायमुर्तीच्या खंडपिठाकडे हे प्रकरण सोपवावे हेच मुळात न्यायीक प्रक्रियेला धरून नाही कारण पाच न्यायमुर्ती खंडपिठाचा निर्णय तीन न्यायमुर्तीवर बंधनकारक असतो. त्यामुळे वर्गवारी बाबतचा निर्णय हा कायदेशीर कमी आणि हेतूनिष्ट व राजकीय स्वरूपाचा जास्त वाटतो. न्यायमुर्ती श्रीमती बेला त्रिवेदी यांनी नेमके याच बाबीवर कायदेशीर बोट ठेवतांना आपल्या स्वतंत्र असहमती निर्णयात योग्य विश्लेषण केलेले आहे.

सर्वोच्च्य न्यायालयीन आरक्षण प्रकरणी प्रत्येक खटल्यामध्ये इंम्पिरिकल डेटा मागीतलेला असताना, यापूर्वी ईडब्लुएस आरक्षण योग्य ठरवितांना असा कोणताही डेटा मागीतला नाही व वर्गीकरणही केले नाही. याही निकालपत्र अगोदर वर्गीकरण समर्थनार्थ डेटा मागीतला नाही आणि उच्च जातीय वर्गहिताचे, मानसिकतेचे आरक्षण विरोधी धोरण लक्षात घेऊन त्यास आरक्षणाचा फायदा तळागळातील अत्यंत दुर्लक्ष जातींना मिळाला पाहीजे असा मुलामा चढवित

सुप्रिम कोर्टाने दिलेला हा निर्णय प्रथमदर्शनी जरी आकर्षक वाटत असला तरी याचे गंभीर सामाजिक परिणाम होणार. यामुळे प्रत्येक राज्यात विविध राजकीय पक्षाव्दारे याचे राजकारण होणार हे निशसय. राजकीय राखीव जागा संदर्भात सर्वोच्च्य न्यायालयाने जाणिवपूर्वक दुर्लक्ष केलेले असून त्या वर्गीकरणाबाबत चकार शब्द काढलेला नाही. न्यायमुर्ती श्री भुषण गवई आणि इतर तीन न्यायमुर्तीनी अनु. जाती-जमाती करिता सिफारस केलेली क्रेमिलियर अट भविष्यात लागू करावी हे दुसरे तीसरे काही नसून आरक्षण कक्षेतील समाजघटकांना वरिष्ठ श्रेणीतील पदे प्राप्त होऊ न देण्याचे षडयंत्र म्हटले पाहीजे. जेंव्हा की, २००८ सालच्या अशोक ठाकूर निवाड्या मध्ये व मंडल निकाल पत्र निवाड्यामध्ये सर्वोच्च्य न्यायालयाने असे धोरण अनु. जाती व जमातींना लागू करने हे अयोग्य होय असे निर्णय दिले असतानासुध्दा, न्यायमुर्ती भुषण गवई व इतर तीन न्यायमुर्ती महोदयांनी क्रेमिलियर धोरणाचे समर्थन करून कायदेशीर धाडसच नव्हे तर धोकादायक धाडस केले आहे.

संक्षिप्तपणे, ओबीसीचे रोहिणी आयोगानुसार तुकडेकरण, आदिवासी डिलीस्टींग, मुस्लीम आरक्षणास विरोध या केंद्र सरकारच्या भूमिकेनंतर, दलित-आदिवासींचे वर्गीकरणाचा सर्वोच्च्य न्यायालयाचा हा निर्णय न्यायव्यवस्था प्रक्रियेनुसार नाही. या निर्णयाने १९५० ते २०२४ म्हणजेच ७४ वर्षे स्थापित झालेल्या आरक्षण धोरणाला विस्थापित केले आहे. या निर्णयाने अनु. जाती-जमातीच्या आरक्षणाचे राजकारण व त्याव्दारे स्वार्थी वोट बँकेचे राजकारण करण्यास देशातील राजकीय पक्षाना रान मोकळे केलेले आहे. सदर निर्णयाने आरएसएस-भाजपा प्रणित दलित-आदिवासीचे हिंदूत्वीकरण धोरणास पूरकता निर्माण केली आहे. सदर निर्णयाने अनु. जाती व जमाती यांच्यातील परस्पर व्देष, जाती संघर्ष यांना खतपानी घातले आहे आणि क्रेमीलिअर धोरणाची सिफारस करून नव्या वादाला तोंड फोडलेले आहे. त्यामुळेच या निर्णयाचा पुर्नविचार होने किंवा संसदेव्दारे बदल करणे हे आवश्यक आहे. यासाठी केंद्रातील राजकीय पक्षाच्या भुमिकेला अनन्नसाधारण महत्व आहेच परंतू गेल्या लोकसभेत संविधान बचाव, लोकशाही बचाव व आरक्षण बचाव नावाखाली ज्या पक्षांनी दलित आदिवासी व मुस्लीम यांची मते घेतली त्यांना देखील या निर्णयाने संविधान आरक्षण रक्षणाची जबाबदारी दिलेली आहेच. आणि जर हे घडलेच नाही तर मात्र देशातील दलित, आदिवासी, ओबीसी, मुस्लिम व इतर शोषित समाज घटकानी एकत्रित प्रखर संघर्ष केल्याशिवाय संविधानात्मक आरक्षण व इतर अधिकार सुरक्षित राहणार नाहीच हेच सत्य होय.

*****